**<u>बृहन्मुंबई महानगरपालिका - शिक्षण विभाग</u>**

क्र. ईओ/अनु/[redacted]/१३५ दि. 16/03/2016

शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय,
लखमशी नप्पू मार्ग, हिंदू कॉलनी
दादर(पुर्व), मुंबई- 400014

**<u>नमुना दोन</u>**

व्यवस्थापक/ मुख्याध्यापक
एच.व्ही.पी.एस.इंटरनॅशनल स्कुल,
ओशिवरा, अंधेरी (प.),
मुंबई - 400 053

विषय – बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, 2011 याच्या नियम 11, पोट- नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

माननीय महोदय / महोदया,

मी शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका दिनांक 1.6.2013 पासून दिनांक 31.5.2016 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 1 ली ते इयत्ता 8 वी करिता एच.व्ही.पी.एस. इंटरनॅशनल स्कूल

-या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहेः-**

1.मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

2.बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, 2009(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा नियम, 2011(जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.

3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

4.परिच्छेद 3मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

5.संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

6.कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

HVPS INTERNATIONAL SCHOOL MUMBAI

For HVPS International School
Principal

7.(एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार)प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच)विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि

(आठ)शिक्षकाने /शिक्षिकेने खाजगी शिकविणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेवू नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

8.शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

9.शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

10.शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-

| | |
|---|---|
| • शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | 2275.99 sq.mt |
| • एकूण बांधकाम क्षेत्र | 2275.99 sq.mt |
| • खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | — |
| • वर्गखोल्यांची संख्या | 07 |
| • कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली | 04 |
| • मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. | आहे |
| • पिण्याच्या पाण्याची सुविधा | आहे |
| • दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | आहे |
| • अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रीडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता | आहे |
| • वाचन साहित्य विनासायास उपलब्ध. | आहे |

HPVS INTERNATIONAL SCHOOL MUMBAI

For HVPS International School

Principal

11. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम 1860 (1860चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विकास व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

14.शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरिता किंवा कोणताही नफा चालविण्यात येत नाही.

15.शाळेचे लेखी सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखी विवरणपत्राची एक प्रत संबंधित उपशिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

16.तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक ---------------- असा आहे, हा या कार्यालयाशी कोणत्याही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

17.शिक्षणाधिकारी / उपशिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

18संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

19जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

टिप:- महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (वंचित गटातील बालकांना व दुर्बल घटकातील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश देण्याकरिता जागा ठेवण्याची रीत ) नियम-2012 या मधिल तरतूदी, विनाअनुदानित अल्पसंख्यांक शाळांना लागू होणार नाहीत.

आपला विश्वासू

17/3/16

शिक्षणाधिकारी

बृहन्मुंबई महानगरपालिका

HPVS INTERNATIONAL SCHOOL * MUMBAI

For HVPS International School

Principal